## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक - १७७३/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी |
|---|---|
| श्री.देवदास बळीराम निकाळजे | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय पौड तालुका मुळशी, जिल्हा पुणे |

(निर्णय दिनांक- १३.०२.२०२५ )

तक्रारदार यांनी दि. १३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये तक्रारदार यांनी ' राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ यांनी द्वितीय अपील क्रमांक ४६६२/२०२२/पुणे याप्रकरणी दिनांक १९.३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी काहीही उत्तर दिले नाही ' अशा आशयाची तक्रार केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय पौड तालुका मुळशी यांनी द्वितीय अपील क्रमांक ४६६२/२०२२/पुणे याप्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय पौड तालुका मुळशी यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात आयोगात सादर करावा. या निर्देशासह सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

14.2.25

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.
दिनांक- 6/3/2025

तक्रार क्रमांक - १७७३/२०२४/पुणे 7381/2025